# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः24.11.2025** **वारःसोमवार**

---

1. जी वीस शिखर परिषदेत, मानवकेंद्रित, जागतिक आणि मुक्त स्रोतावर आधारित तंत्रज्ञानाची गरज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली अधोरेखित
2. देशाचे 53वे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती सूर्य कांत आज शपथ घेणार
3. माहे युद्धनौका आज मुंबईत नौदलाच्या ताफ्यात दाखल होणार
4. दृष्टीहीन महिलांच्या टी-20 क्रिकेट विश्वचषकावर भारतानं कोरलं नाव आणि
5. ऑस्ट्रेलियन खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष एकेरीमध्ये लक्ष्य सेन विजयी

**पंतप्रधान**

दक्षिण आफ्रिकेतल्या जोहान्सबर्गमध्ये G20 नेत्यांच्या शिखर परिषदेचा काल समारोप झाला. 'एकता, समानता आणि शाश्वतता' हे या वर्षीच्या शिखर परिषदेचं घोषवाक्य होतं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल या संमेलनाच्या तिसऱ्या सत्राला संबोधित केलं. तंत्रज्ञान वित्तकेंद्रित नाही तर मानव-केंद्रित असावं, ते जागतिक आणि मुक्त स्रोतावर आधारित असायला हवं, असं प्रतिपादन पंतप्रधान मोदींनी केलं. या शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांनी विविध देशांच्या प्रमुख नेत्यांशी द्विपक्षीय चर्चा केली.

भारत-ब्राझील-दक्षिण आफ्रिका यांचा ईबसा हा त्रिपक्षीय मंच केवळ तीन देशांचा गट नसून तीन खंड, तीन मोठ्या लोकशाही आणि तीन मोठ्या अर्थव्यवस्थांना जोडणारं व्यासपीठ आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या तीन बैठकीत केलं. हे तीन देश एकमेकांच्या विकासाला पूरक ठरतील आणि शाश्वत विकासाचं उदाहरण निर्माण करतील असा विश्वास मोदी यांनी व्यक्त केला.

**सरन्यायाधीश**

भारताचे 53वे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती सूर्य कांत आज सूत्रं हाती घेणार आहेत. राष्ट्रपती भवनात होणाऱ्या सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू त्यांना पदाची शपथ देतील. त्यांचा कार्यकाळ फेब्रुवारी 2027 पर्यंत असणार आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई काल निवृत्त झाले.

**माहे जहाज**

माहे ही युद्धनौका आज मुंबईत नौदलाच्या ताफ्यात दाखल होणार आहे. माहे या श्रेणीतली ही पहिली पाणबुडीरोधी उथळ पाण्यातली युद्धनौका कोचीच्या जहाजबांधणी गोदीत तयार झाली असून यात 80 टक्क्यापेक्षा जास्त सामग्री स्वदेशी बनावटीची आहे. मलबार किनारपट्टीवरच्या माहे या ऐतिहासिक गावावरून हिचं नाव ठेवण्यात आलं आहे. या युद्धनौकेचं प्रतीक असलेली उरुमी ही तलवार, कलरीपयट्टू या युद्धकलेचा महत्त्वाचा भाग आहे. लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी, नौदलाच्या पश्चिम विभागाचे प्रमुख व्हाईस ॲडमिरल कृष्णा स्वामीनाथन या सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत. देशाच्या सागरी सीमांच्या रक्षणासाठी समर्पित ही युद्धनौका पश्चिम किनाऱ्यावर तैनात असेल.

**ॲग्रोव्हिजन**

नागपुरात सुरु असलेल्या 'ॲग्रो व्हिजन -2025' या कृषी प्रदर्शनाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल भेट दिली. प्रदर्शनातली कृषी उत्पादने आणि पूरक उद्योगांच्या दालनांची पाहणी करून मुख्यमंत्र्यांनी शेतीतील आधुनिक तंत्रज्ञानाबाबत माहिती जाणून घेतली. प्रदर्शनाचे प्रणेते आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, बारामती ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे विश्वस्त प्रतापराव पवार, ॲग्रो व्हिजन फाऊंडेशनचे अध्यक्ष रवी बोरटकर यावेळी उपस्थित होते. फाऊंडेशनला 10 वर्षे पूर्ण झाल्याबद्दल तयार करण्यात आलेल्या कॉफी टेबल बुकचं फडणवीस यांच्या हस्ते प्रकाशन झालं.

विदर्भातल्या शेतकऱ्यांना उत्पादन वाढीसाठी कृत्रिम बुद्धीमत्तेवर आधारित तंत्रज्ञानाचं मार्गदर्शन सुलभ करून देण्यासाठी एक सामंजस्य करार काल करण्यात आला. ॲग्रोव्हिजन फाउंडेशन, नागपूरचे नॅशनल ब्युरो ऑफ सॉईल सर्व्हे अँड लँड यूज प्लॅनिंग आणि बारामती ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट यांच्यात हा करार झाला असून सुरवातीला तूर, उस आणि संतरा या पिकांवर लक्ष केंद्रित केलं जाणार आहे.

**कार्यशाळा**

राज्यातल्या अभियांत्रिकी महाविद्यालयांसाठी परिणामाधिष्ठित शिक्षण आणि मूल्यांकन या विषयावरील एक कार्यशाळा आज मुंबईत होत आहे. नेशनल बोर्ड ऑफ एक्रेडिटेशन, तंत्र शिक्षण संचालनालय आणि मुंबई विद्यापीठ यांनी संयुक्तपणे या कार्यशाळेचं आयोजन केलं आहे. कार्यशाळेचं उद्घाटन उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते होणार आहे. कार्यशाळेत विविध विषयांवर तज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात येणार असून संस्थेच्या गुणवत्तावर्धनासाठी ही कार्यशाळा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

**नदी प्रदूषण**

पुण्यातील नद्यांच्या प्रदूषणाच्या मुद्द्यावर ठोस आणि दीर्घकालीन उपाय करण्याच्या दृष्टीने विविध स्वयंसेवी संस्था कार्य करत आहेत. पुणे रिव्हर रिव्हायवल ही संस्था त्यातीलच एक, या संस्थेच्या प्राजक्ता महाजन, यांनी पुण्यातील नद्यांच्या सद्यस्थितीचा घेतलेला हा आढावा.....

**पुण्यातल्या नद्यांबद्दल म्हणायचं झालं तर आपल्या इथल्या नद्यांमध्ये आपल्या घरातलं जे सांडपाणी आहे. फक्त तीस टक्के सांडपाण्यावर प्रक्रिया होते बाकी सत्तर टक्के पाणी हे तसंच नदीत सोडलं जातं. आणि त्या पाण्यावर प्रक्रिया करणं अतिशय आवश्यक आहे म्हणून दोन हजार चौदा साली एक जपानच्या सहकार्याने जायका प्रोजेक्टचा जाहीर झाला, तर या जायका प्रकल्पामध्ये अकरा सांडपाण्यावर प्रक्रिया करणारी केंद्रं होणं अकरा अपेक्षित होत तर ते काम तसंच खोळंबलेलं आहे आणि ते सगळ्यात महत्वाचं काम आहे. त्याला प्राधान्य द्यायला पाहिजे दोन हजार सोळा साली हा नदीकाठ सुशोभीकरण प्रकल्प पुणे महानगरपालिकेने जाहीर केला, आणि हा प्रकल्प इतका महत्वाकांक्षी आहे, की तो चार हजार सातशे कोटी रुपयांचा प्रकल्प आहे. याला नद्यांना मार्ग आखून देणार आहे. अठ्ठ्याऐंशी किलोमीटर एवढ्या लांबीचे नदीला तटबंध बांधणार आहे, पण नागरिक म्हणून आणि वेगळ्या वेगळ्या स्वयंसेवी संस्थांची आणि पुण्यातल्या सामान्य नागरिकांची हीच मागणी आहे, की पुण्याच्या नदीकाठच्या वनराय आहेत त्यांचं संरक्षण झालं पाहिजे, कारण तिथे फक्त झाडी नसून तिथे अख्खंच समृद्ध वनजीवन आहे. तिथे पक्ष्यांची घरटी आहेत वेगळ्यावेगळ्या प्राण्यांचे अधिवास आहेत वेगवेगळ्या प्रकारचे फुलपाखरं आहेत वेगळेवेगळे कीटक आहेत तर या सगळ्यांचं संरक्षण व्हायला पाहिजे आणि ते सगळं संरक्षित करून जो काही नदी सुधार करता येईल म्हणजे मुख्यतः सुधार म्हणण्यापेक्षा स्वच्छता जी करता येईल नदीच्या पाण्यातलं प्रदूषण कमी करणे आणि काठावरती स्वच्छता राखणे एवढीच नागरिकांची मागणी आहे.**

**गुरु-तेगबहादूर-नांदेड**

नांदेडमध्ये श्री सचखंड गुरुद्वारा बोर्डाच्या वतीनं श्री गुरु तेग बहादूर यांच्या 350 व्या बलिदान दिनाचं स्मरण करण्यासाठी विविध धार्मिक, सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलं आहे. विविध धार्मिक कार्यक्रमांबरोबरच रक्तदान शिबिर, वैद्यकीय शिबिरे असे कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून ते उद्यापर्यंत चालणार आहेत.

**कडधान्य-खरेदी-सोलापूर**

राज्यात 2025-26 या हंगामासाठी कडधान्य खरेदीला महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महामंडळ आणि नाफेड यांनी संयुक्तपणे सुरुवात केली आहे. सोलापूर जिल्ह्यात सात हमी भाव खरेदी केंद्रं उभारण्यात आली आहेत. शेतकऱ्यांनी खरेदी केंद्रावर प्रथम पिकाची नोंदणी करणे आवश्यक आहे. मूग 8768 रूपये प्रति क्विंटल, उडीद 7800 रूपये प्रति क्विंटल आणि सोयाबीन 5328 रूपये प्रति क्विंटल असे आधारभूत दर केंद्र शासनानं निश्चित केले आहेत.

**उस-वजनचोरी**

उसाची वजन चोरी आणि साखर उतारा चोरीबाबतच्या तक्रारींची चौकशी केली जाणार आहे. यासाठी भरारी पथकांनी तपासण्या कराव्यात, अश्या सूचना प्रादेशिक साखर सहसंचालकांना दिल्या आहेत, अशी माहिती साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांनी

दिली. साखर आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली पश्चिम महाराष्ट्रातील विविध शेतकरी संघटनांचे पदाधिकारी, प्रतिनिधींबरोबर ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर बैठक झाली. यामध्ये शेतकऱ्यांनी केलेल्या तक्रारींनुसार संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी शेतकरी संघटनांनी डॉ. कोलते यांच्याकडे केली.

**ऊसदर-बीड**

बीड जिल्ह्यात ऊसदराच्या प्रश्नावर शेतकरी संघटना एकत्र आल्या असून आजपासून बेमुदत चक्काजाम आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. जिल्ह्यातल्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आंदोलनात सामील असल्याचं सांगत ऊस दर आणि इतर मागण्या संदर्भात जोरदार घोषणाबाजी केली.

**नवलेपूल अपघात**

पुण्यातील नवले पूल अपघाताच्या पार्श्वभूमीवर पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयानं खेड शिवापूर टोल नाक्याजवळ दोन वायुवेग पथकांची नियुक्ती केली आहे. नियमांचं पालन न करणाऱ्या वाहनांवर या पथकाकडून कारवाई केली जात आहे.

**आता क्रीडा वृत्त**

**दृष्टीहिन-महिला**

भारतीय दृष्टीहिन महिलांच्या क्रिकेट संघानं काल कोलंबोमध्ये पहिला टी-20 विश्वचषक जिंकून इतिहास घडवला. अंतिम सामन्यात भारतीय संघानं नेपाळला नमवून चषक उंचावला. नेपाळनं ठेवलेलं 114 धावांचं आव्हान भारतीय महिलांनी 12 षटके आणि एका चेंडूत 3 खेळाडूंच्या मोबदल्यात पार केलं. भारतीय महिलांनी या स्पर्धांमध्ये एकही सामना गमावला नाही.सोलापूरच्या गंगा कदम हिचा भारतीय संघातील सहभाग लक्षणीय ठरला. संपूर्ण स्पर्धेत तीन खेळाडू बाद आणि सहा खेळाडू धावबाद करणाऱ्या गंगा कदम हिनं उपांत्य फेरीत ऑस्ट्रेलियाविरुद्ध 31 चेंडूत 3 चौकारांच्या सहाय्याने नाबाद 41 धावा फटकावल्या होत्या.

**पुरुष-क्रिकेट**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील गुवाहाटीमध्ये सुरू असलेल्या दुसऱ्या क्रिकेट कसोटी सामन्यात भारतानं काल दुसऱ्या दिवसअखेर आपल्या पहिल्या डावाला सुरवात करत 9 धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेनं पहिल्या डावात 489 धावा केल्या आहेत. कुलदीप यादवनं चार बळी घेतले.

**लक्ष्यसेन**

बॅडमिंटनमध्ये भारताच्या लक्ष्यसेननं कालचा दिवस गाजवला. सिडनीमध्ये झालेल्या ऑस्ट्रेलियन खुल्या बॅडमिंटन स्पर्धांमध्ये पुरुष एकेरीचा किताब जिंकून लक्ष्य सेननं या वर्षातलं आपलं पहिले विजेतेपद मिळवलं. लक्ष्य सेननं अंतिम सामन्यात जपानच्या युशी तानाकाला 21-15, 21-11 असं नमवलं.

**हवामान**

राज्यातली थंडी काहीशी ओसरली असून हवामान कोरडं आहे. कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी हलका पाउस पडण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.